**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे-४११००१

श्री.दत्तात्रय श्रीरंग केंगार
५८, कस्तुरवाडा, हॉटेल रंगोलीसमोर,
होटगी रोड, सोलापूर

अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी,
जिल्हा परिषद, सोलापूर

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा शासकीय माहिती अधिकारी,
जिल्हा पशुसंवर्धन कार्यालय, जिल्हा परिषद, सोलापूर

| | |
|---|---|
| १.अपील क्रमांक | २६० / सोलापूर / २००६ |
| २.सुनावणीची तारीख | ३१.१.२००८ |

३.उपस्थित

**अपीलकर्ता** श्री.दत्तात्रय श्रीरंग केंगार
५८, कस्तुरवाडा, हॉटेल रंगोलीसमोर, होटगी रोड, सोलापूर

**अपिलीय प्राधिकारी** तथा जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी,
जिल्हा परिषद, सोलापूर श्री.एम.बी.बनसोडे

**जन माहिती अधिकारी** तथा शासकीय माहिती अधिकारी,
जिल्हा पशुसंवर्धन कार्यालय, जिल्हा परिषद, सोलापूर डॉ.एस.टी.कोंडुभैरी

| | |
|---|---|
| ४.जन माहिती अधिकाऱ्यांकडे केलेल्या अर्जाची तारीख | २८.२.२००५, २४.८.२००५, २८.१२.२००५ |
| ५.जन माहिती अधिकाऱ्यांनी दिलेल्या आदेशाची तारीख | १.४.२००५, २९.४.२००५, १.१०.२००५ |
| ६.अपिलीय प्राधिकाऱ्यांकडे केलेल्या अपिलाची तारीख | २४.१०.२००५ |
| ७.अपिलीय प्राधिकाऱ्यांनी दिलेल्या आदेशाची तारीख | २०.१२.२००५ |

८. **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**

दि.३१.३.२००३ व ५.४.२००३ रोजी सोलापूर जिल्हा परिषदेच्या पशुसंवर्धन खात्यात पशुधन पर्यवेक्षक पदाच्या मुलाखतीनंतर प्रसिध्द करण्यात आलेली निवड यादीची नक्कल, नोटीस बोर्डावर पशुधन पर्यवेक्षक या पदासाठी प्रसिध्द करण्यात आलेली जाहिरातीची नक्कल, आवक पत्रांची नोंदवहीतील दि.५.४.२००३, ७.४.२००३, २५,.४,२००३ व ३०.४.२००३ रोजी आवक पत्रांची नोंद झालेली नक्कल. ही यादी रद्द करुन सुधारित निवड यादी करण्याचे कारण व सुधारित यादीची प्रसिध्द केलेली नक्कल. वरील तारखेच्या पत्रांची नोंद आवक रजिस्टरला आढळत नाही, ही नोंद कोणत्या तारखेला घेतली त्याची नक्कल. पुरविण्यात आलेल्या नकला जबाबदार अधिकारी यांनी साक्षांकित केलेल्या नाहीत. निवड झालेल्या उमेदवारांना निवड समितीने प्रदान केलेल्या गुणपत्रिकेची प्रत.सेवायोजन कार्यालयाकडून आलेल्या उमेदवारांची यादी, सहपत्रे. दि.२२.११.२००५ रोजी अपिलाची चौकशी झाली त्यावर घेतलेल्या निर्णयाची प्रत.

## विवेचन

सोलापूर जिल्हा परिषदेच्या पशुसंवर्धन विभागात मागासवर्गीय अनुशेष भरती कार्यक्रमांतर्गत पशुधन पर्यवेक्षक पदासाठी अनुसूचित जाती प्रवर्गात चार जागांकरिता दि.२५.३.२००३ रोजी मुलाखती झाल्या. दि.३१.३.२००३ रोजी निवड झालेल्या उमेदवारांची यादी फलकावर लावण्यात आली, त्यात आपले नाव चौथ्या क्रमांकाला होते. परंतु त्यानंतर आठवड्यात दि.५.४.२००३ रोजी जाहीर केलेल्या सुधारित यादीत आपले नाव वगळून अन्य व्यक्तीचे नाव समाविष्ट करण्यात आले, अशी अपीलकर्ता श्री.नागनाथ निवृत्ती कुंभार यांची तक्रार असून त्या संदर्भातील माहिती त्यांनी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, सोलापूर यांच्याकडे दि.१९.१.२००५ रोजी अर्ज केला. पशुसंवर्धन अधिकारी जन माहिती अधिकारी असल्याचे त्यांनी कळविल्यावर श्री.केंगार यांनी जन माहिती अधिकारी तथा जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी, जिल्हा परिषद, सोलापूर यांच्याकडे दि.२८.२.२००५ रोजी अर्ज केला. महाराष्ट्र माहितीचा अधिकार २००५ अंतर्गत हा अर्ज श्री.केंगार यांनी दि.२८.२.२००५ रोजी केला होता. एक महिन्याच्या मुदतीत माहिती न मिळाल्यामुळे श्री.केंगार यांनी जन माहिती अधिकारी याना स्मरणपत्र पाठविले. त्यानंतर दि.१.४.२००५ या तारखेला जन माहिती अधिकारी यांनी निःशुल्क पाठविलेली माहिती त्यांना दि.६.४.२००५ रोजी मिळाली. ही माहिती अपूर्ण व दिशाभूल करणारी असल्याचे व साक्षांकित नसल्याचे नमूद करुन श्री.केंगार यांनी

अपिलीय प्राधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, सोलापूर यांच्याकडे अपील केले. त्याची सुनावणी अपिलीय प्राधिकारी म्हणून जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी यांच्यापुढे झाली व त्यांनी आपल्या अपिलाची योग्य दखल घेतली नाही, शुल्क न भरल्याचे कारण दाखवून व कागदपत्रे देण्यात आल्याचे नमूद करुन त्यांनी आपले अपील फेटाळले, या कारणावरुन श्री.केंगार यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

पशुधन पर्यवेक्षक या पदासाठी झालेल्या निवडीत आपल्यावर अन्याय झाला व भ्रष्टाचार होऊन आपले नाव यादीतून वगळले गेले, असा श्री.केंगार यांचा आरोप आहे. तत्कालीन जन माहिती अधिकारी डॉ.नारायण गायकवाड यांनी आपल्यापासून माहिती लपवून ठेवली, तसेच 'जिल्हाधिकाऱ्यांच्या आदेशाने निवड यादीत बदल झाला,' असे कळवितानाच आपण मागितलेली जिल्हाधिकाऱ्यांच्या आदेशाची प्रत मात्र उपलब्ध नसल्याचे कळविले. पर्यायाने माहिती नाकारली. 'आपण दि.५,७ व ३०.४.२००३ रोजी जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी कार्यालयाला दिलेले पत्र आढळून येत नाही. त्याच्या प्रती आपल्या कार्यालयाला पाठवाव्यात. म्हणजे आपणास समर्पक उत्तर कळविण्यात येईल,' असे तत्कालीन जन माहिती अधिकारी डॉ.नारायण गायकवाड यांनी आपल्याला कळविले. या पत्रांची त्यांच्या कार्यालयातील पोहोच आपल्याकडे असतानाही संबंधित कागदपत्रे उपलब्ध नसल्याचे त्यांनी नमूद केले. मात्र डॉ.गायकवाड यांची बदली झाल्यानंतर दि.२८.१२.२००५ ला आपण माहितीचा अधिकार अधिनियम २००५ खाली पुन्हा अर्ज करुन या प्रती मागितल्या, तेव्हा डॉ.गायकवाड यांच्या जागी आलेले नवे अधिकारी डॉ.एम.बी.बनसोडे यांनी जिल्हाधिकाऱ्यांच्या आदेशाच्या प्रतीसह सर्व कागदपत्रे आपल्याला दिली. यावरुन डॉ.गायकवाड यांनी जाणीवपूर्वक दिशाभूल करुन माहिती नाकारली; हे स्पष्ट होते, असे श्री.केंगार यांनी आयोगापुढील सुनावणीत लेखी व तोंडी नमूद केले.ही परिस्थिती लक्षात घेता डॉ.गायकवाड यांच्या हेतूबद्दल व कार्यपध्दतीबद्दल आपल्याला साशंकता आहे, असे प्रतिपादन श्री.केंगार यांनी केले.

आयोगाकडील अपिलांच्या संदर्भात आयोगाने दि.१६.१०.२००७ रोजी संबंधितांना विचारणा केली होती. त्यावर जन माहिती अधिकारी तथा पशुधन विकास अधिकारी (तां)

डॉ.एस.टी.कोंडुभैरी यांनी दि.३०.१०.२००७ रोजी निवेदन सादर केले. या विषयाच्या संदर्भात श्री.केंगार यांनी लोकशाही दिनापासून कायदेशीर नोटिशीपर्यंत अनेक मार्गांनी सातत्याने पत्रव्यवहार, तक्रारी केल्या असून कागदपत्रांची मागणी केली आहे व त्या त्या वेळी त्यांना माहिती व उत्तरे देण्यात आली आहेत. अर्जाला आवश्यक मुद्रांक लावलेला नसताना व माहितीसाठी शुल्क भरलेले नसतानाही माहिती देण्यात आली आहे. तसेच प्रथम अपिलाच्या सुनावणीच्या वेळी नव्याने मागणी केलेली कागदपत्रे ही साक्षांकित करुन दिली आहेत, असे डॉ.कोंडूभैरी यांनी त्यांच्या निवेदनात नमूद केले आहे. संबंधित सर्व कागदपत्रे श्री.केंगार यांना देण्यात आल्याचे प्रथम अपिलाच्या निकालपत्रासोबत तत्कालीन अपिलीय प्राधिकारी डॉ.बनसोडे यांनी नमूद केले आहे. दि.२०.१२.२००५ तारीख असलेले हे निकालपत्र आपल्याला दि.२२.२.२००६ राजी मिळाल्याचे श्री.केंगार यांनी निकालपत्र स्वीकारताना नमूद केले आहे. तसेच श्री.केंगार यांनी दि.१३.११.२००७ रोजी आयोगाला सादर केलेल्या निवेदनानुसार अपेक्षित माहिती मिळाल्याचे नमूद केले आहे. मात्र डॉ.गायकवाड यांनी शुल्क कळविले नव्हते, त्यामुळे शुल्क भरण्याचा प्रश्न आला नाही, त्यांनी निःशुल्क माहिती पाठविली तीही अर्धवट व दिशाभूल करणारी होती. त्यांची बदली झाल्यावर आलेल्या नवीन अधिकाऱ्यांनी माहिती दिली. जिल्हाधिकाऱ्यांच्या आदेशाची प्रत, संबंधित कागदपत्रे वेळीच आपल्याला न मिळाल्यामुळे आपण अन्यायाविरुध्द दाद मागण्यापासून वंचित राहून आपले अतोनात नुकसान झाले. याबद्दल डॉ.गायकवाड यांच्यावर कारवाई व्हावी, अशी मागणी श्री.केंगार यांनी दि.१३.११.२००७ च्या निवेदनाद्वारे, तसेच आयोगापुढील सुनावणीतही केली.

उभय बाजूंची निवेदने व सादर करण्यात आलेली कागदपत्रे पाहता तत्कालीन जन माहिती अधिकारी डॉ.नारायण गायकवाड यांनी विहित मुदतीत माहिती दिली नाही, तसेच माहिती उपलब्ध असतानाही ती नसल्याचे कळविले हे स्पष्ट होते. या स्थितीत कारवाईपूर्वी त्यांची बाजू जाणून घ्यावी यासाठी डॉ.गायकवाड यांनी आठ दिवसात खुलासा सादर करावा, असा आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळीच दिला होता. विद्यमान अपिलीय प्राधिकारी श्री.बनसोडे यांनी डॉ.गायकवाड यांना तो कळवावा, या आयोगाच्या आदेशानुसार डॉ.बनसोडे यांनी त्याच दिवशी, म्हणजे दि.३१.१.२००८ रोजी पत्रान्वये डॉ.नारायण आत्माराम गायकवाड

(त्यावेळी सहाय्यक आयुक्त, पशुसंवर्धन, जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त यांचे कार्यालय, बुलढाणा) यांना राज्य माहिती आयोगाकडे आठ दिवसात खुलासा सादर करण्याबाबत कळविले. डॉ.गायकवाड यांनी या मुदतीतच नव्हे तर नंतरही जवळजवळ सहा महिने काहीही खुलासा केला नाही. आयोगाने स्मरण दिल्यानंतर दि.१.८.२००८ रोजी डॉ.गायकवाड यांनी त्यांचा खुलासा सादर केला. 'श्री.केंगार यांना माहिती पुरविण्यात आलेली आहे, पुरविलेल्या माहितीबाबत बिनबुडाचे म्हणणे दाखल करुन श्री.केंगार वरिष्ठांची दिशाभूल करण्याचा प्रयत्न करीत आहे. माझ्या कालावधीत दिलेली माहिती बरोबर व परिपूर्ण आहे' असे त्यांनी या खुलाशात म्हटले आहे. डॉ.गायकवाड यांनी त्यांच्या खुलाशात माहिती उशिरा का दिली माहिती देण्याची टाळाटाळ का झाली, जिल्हाधिकाऱ्यांचा आदेश उपलब्ध असताना आढळत नसलयाचे का कळविले, श्री.केंगार यांची पत्रे कार्यालयाची पोच असताना उपल्बध होत नसलयाचे कळवताना या पत्रांबाबत कार्यालयांतर्गत शोध का घेतला नाही,' याबाबत काहीही स्पष्टीकरण दिलेले नाही. तसेच दि.१.७.२००५ रोजी आपली बदली झाल्याचे नमूद केले आहे. परंतु माहिती त्यांच्या कालावधीतच मागितलेली आहे, त्यांनीच त्याबाबतची उत्तरे दिली आहेत. माहितीचा हा विषय तयांनीच हाताळला आहे. त्यामुळे त्याच्या परिणामांना तेच जबाबदार ठरतात. हा खुलासा मान्य करण्याजोगा नाही.

श्री.केंगार यांनी निवडीबाबत केलेले आरोप हा राज्य माहिती आयोगाच्या कक्षेतील विषय नाही. तसेच अर्जाच्या अनुषंगाने त्यांनी मोठ्या प्रमाणावर केलेला पत्रव्यवहार व मूळ अर्जाच्या कक्षेबाहेरील त्यांचे भाष्य याची दखल आयोगाने घेण्याचे कारण नाही. मात्र विहित मुदतीत माहिती न देणे, माहिती देण्यास टाळाटाळ करणे, व माहिती उपलब्ध असताना नसल्याचे कळवून अपुरी व चुकीची माहिती देणे अशा अनेक प्रकारे डॉ.नारायण आत्माराम गायकवाड यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चा भंग केला आहे. यातील एक बाबही शास्तीस पात्र ठरते, या स्थितीत अनेक बाबींबद्दल तर त्यांना शास्ती लावणे अपरिहार्य ठरते.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

# आदेश

(१) अपील मान्य.

(२) विहित मुदतीत माहिती न देणे, माहिती देण्यास टाळाटाळ करणे, व अपुरी व चुकीची माहिती देणे याबद्दल डॉ.नारायण आत्माराम गायकवाड यांना रुपये २५००० शास्ती लावण्यात येत आहे. ही शास्ती सप्टेंबर महिन्यात मिळणाऱ्या ऑगस्ट महिन्याच्या पगारातून वसूल करुन ती दि.१५.९.२००८ पर्यंत '००७, इतर प्रशासकीय सेवा, ६०, इतरसेवा, ८००, इतर जमा रकमा, (१८) माहितीचा अधिकार (००७००१६१)' या लेखाशिर्षाखाली जमा करण्याची कार्यवाही करुन पूर्तता अहवाल आयोगाला सादर करावा. तसेच याबाबत संबंधितांच्या सेवापुस्तकात व गोपनीय अहवालात नोंद घेऊन त्याच्या छायांकित प्रती आयोगाला सादर कराव्यात. ही जबाबदारी अपिलीय प्राधिकारी तथा जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी, सोलापूर यांची राहील.

(३) जिल्हाधिकारी यांनी पशुधन पर्यवेक्षक पदाच्या भरती मोहिमेमध्ये निवडीबाबत केलेल्या फेरफाराची माहिती व त्या संदर्भातील कागदपत्रे विहित मुदतीत अपीलकर्त्यास का दिली गेली नाहीत याबाबतची सखोल चौकशी करुन विभागीय आयुक्त, पुणे विभाग, पुणे यांनी दि.५ सप्टेंबर २००८ पर्यंत आयोगाला अहवाल सादर करावा असे आदेश देण्यात येत आहेत.

**पुणे**
**दि. ७.८.२००८**

**( विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

प्रत-विभागीय आयुक्त, पुणे विभाग ... ईसाठी.

ऑगस्ट-०८-७-११

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे-४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे 'विशेष अपील निर्गत कार्यक्रम' दि.२४.०६.२००८ रोजी पुणे येथे आयोजित करण्यात आला होता. त्यात खालील अपिलाचा समावेश होता :

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २६४ / पुणे | उपस्थिती |
| २ | अपीलकर्ता | श्री. प्रकाश परशराम कदम<br>दुग्धशाळा पर्यवेक्षक, शासकीय दूध योजना, पुणे<br>मरिआई गेट पोलीस चौकीजवळ, खडकी, पुणे-३ | गैरहजर |
| ३ | जा माहिती अधिकारी | महाव्यवस्थापक, शासकीय दूध योजना, पुणे | हजर |
| ४ | अपिलीय प्राधिकारी | प्रादेशिक दुग्धव्यवसाय विकास अधिकारी, पुणे | हजर |

अपीलकर्ता श्री. प्रकाश परशराम कदम यांनी पगारी सुट्टी, अतिकालिक भत्ता व वेतन निश्चितीचा फरक याबाबतची माहिती मागितली होती.

दि. १.१.१९९४ ते दि. २८.२.२००४ या कालावधीचा वेतन फरक अपीलकर्त्यास दि. १९.३.२००७ रोजी अदा केला आहे, अतिकालिन भत्याचे देयक दि. ९.६.२००८ रोजी कोषागारात दाखल केले आहे. देयक पारित झाल्यावर त्वरित अदा केले जाईल, असे जन माहिती अधिकारी यांनी लेखी नमूद केले.

अपीलकर्त्याने मागणी केलेली माहिती ही प्रशासकीय कार्यवाहीशी संबंधित असून ही बाब माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कक्षेत येत नाही.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**पुणे**
**दि. १२.८.२००८**

**( विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे 'विशेष अपील निर्गत कार्यक्रम' दि. ९.७.२००८ रोजी कोल्हापूर येथे आयोजित करण्यात आला होता. त्यात खालील अपिलाचा समावेश होता :

| १ | अपील क्रमांक | २८० / कोल्हापूर | उपस्थिती |
|---|---|---|---|
| २ | अपीलकर्ता | श्री. मारुती भाऊ महाजन<br>रा.कोरोची (धनगर माळ, अंगणवाडी नजिक)<br>पो.गंगानगर, ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर | हजर |
| ३ | जन माहिती अधिकारी | उप प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, कोल्हापूर | हजर |
| ४ | अपिलीय प्राधिकारी | प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, कोल्हापूर | हजर |

अपीलकर्ता श्री. मारूती भाऊ महाजन यांनी माहितीच्या अर्जान्वये त्यांना कळविण्यात आलेली ध्वनी प्रदूषण मोजणी शुल्क आकारणी कोणत्या नियमाने केली आहे ? तसेच सदरची जागा सार्वजनिक असल्याने हे काम शासकीय कामकाज म्हणून आहे किंवा कसे ? दि. ११.१०.२००६ रोजी ध्वनी प्रदूषण मोजणी केल्यानंतर अद्याप ते बंद का करणेत आले नाही ? अशा तीन मुद्दयांवर माहिती मागितली होती.

त्यावर उप प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, कोल्हापूर यांनी दि. २९.१२.२००६ च्या पत्रान्वये खुलासा केला व माहिती दिली आहे, असे स्पष्ट केले. यानंतर अपीलकर्त्याने पुन्हा दि. २.७.२००७ रोजी माहिती अधिकारान्वये अर्ज करुन दि. २९.१२.२००६ च्या पत्राने कळविल्यानुसार, मोजणीकडे रक्कम रू.२२८०/- जमा झाली असल्यास त्या पावतीची प्रत मागणी केली. सदरची रक्कम जमा झालेली नसल्याने त्याची पावती देण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही, असे जन माहिती अधिकारी यांनी सांगितले. अपीलकर्त्याने त्यावर अपिलीय प्राधिकारी यांचेकडे अपील केले. अपिलीय प्राधिकारी यांनी अपील निकाली ठेवणेत आलेने अपीलकर्त्याने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

वरील सर्व परिस्थिती पाहता मागणी केलेली पावती ही शुल्क वसूल केले गेले नसल्याने देता येत नसल्याचे दिसून येते. इतर माहिती अपीलकर्त्यास प्राप्त झाल्याचे दिसून येते.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. चुकीची मोजणी फी कळविल्यासंबंधी अपिलीय प्राधिकारी यांनी जन माहिती अधिकारी यांची चौकशी करुन वरिष्ठांना अहवाल सादर करावा.

पुणे
दि. ३०.८.२००८

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र, पुणे खंडपीठ

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत,
चौथा मजला, कौंसिल हॉलसमोर,
पुणे -४११ ००१

ॲड.गोविंद जनार्दन पाटील
गुलशननगर, मोहोळ, ता.मोहोळ, जि.सोलापूर — अपीलकर्ता

विरुध्द

**अपिलीय प्राधिकारी** तथा गटविकास अधिकारी,
पंचायत समिती, मोहोळ, ता.मोहोळ, जि.सोलापूर — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा उपअभियंता लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर),
उपविभाग, मोहोळ, ता.मोहोळ, जि.सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २८७ / सोलापूर / २००६ |
| २ | सुनावणीची तारीख | दि. ३१.१.२००८ |

३. उपस्थित

**अपीलकर्ता** ॲड.गोविंद जनार्दन पाटील
गुलशननगर, मोहोळ, ता.मोहोळ, जि.सोलापूर

**अपिलीय प्राधिकारी** तथा गटविकास अधिकारी,
पंचायत समिती, मोहोळ, ता.मोहोळ, जि.सोलापूर श्री.प्रशांतसिंह मरोड

**जन माहिती अधिकारी** तथा उपअभियंता लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर),
उपविभाग, मोहोळ, ता.मोहोळ, जि.सोलापूर श्री.पं.बा.भोसले

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २१.५.२००६ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. -- |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १४.६.२००६ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि.-- |

| ८ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती** |
|---|---|
| | एप्रिल २००१ पासून ते मार्च २००६ पर्यंत मोहोळ तालुक्यामध्ये किती पाझर तलावाच्या कामे झाली याची यादी खालील मुद्देवार व तपशीलवार संकलित माहिती<br>(अ)वर्ष, गांव, किती पाझर तलाव मंजूर झाले, त्यापैकी किती कामे पूर्ण, किती अपूर्ण, अपूर्ण असतील त्याची कारणे, पाझर तलाव वार कामाचे एस्टीमेट, मंजूर संख्या, किती धान्य कुपनाचे वाटप केले.<br>(ब)पाझर तलाव कोणत्या गटामध्ये झाले ते गट नंबर. |

## विवेचन

उपअभियंता लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर), उपविभाग, मोहोळ या कार्यालयामार्फत एप्रिल २००१ ते मार्च २००६ या काळात झालेल्या पाझर तलावांच्या संदर्भातील माहिती अपीलकर्ता ॲड.गोविंद जनार्दन पाटील यांनी जन माहिती अधिकारी तथा उपअभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर), मोहोळ यांच्याकडे मागितली होती. 'माहिती तयार करण्याचे काम चालू असून ती मुदतीत देता येणार नाही, तयार होताच दिली जाईल,' असे जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता, श्रेणी-१ यानी ॲड.पाटील यांना कळविले. दि.२४.७.२००६ रोजी (मूळ अर्जापासून ८२ दिवसांनी) माहिती द्यावयास गेलो असता त्यांनी ती प्रथम अपिलाच्या सुनावणीच्या वेळीच स्वीकारु, असे सांगून घेतली नाही, असे सहाय्यक अभियंता यांनी गटविकास अधिकारी, वर्ग-१, पंचायत समिती, मोहोळ यांना पत्राद्वारे कळविले व माहिती तयार असल्याचे ॲड.पाटील यांना त्याच दिवशी कळविले. अपिलीय प्राधिकाऱ्यांपुढे दि.१६.१०.२००६ रोजी सुनावणीच्या वेळी ॲड.पाटील यांनी ही माहिती स्वीकारली. अपिलीय प्राधिकाऱ्यांनी तीन वेळा सुनावणीची तारीख देऊन निर्णय दिला नाही, या कारणावरुन ॲड.पाटील यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

सुनावणीच्या वेळीच आपण माहिती घेऊ असे सांगितल्याचे सहाय्यक अभियंता श्री.पं.बा.भोसले यांनी केलेले प्रतिपादन चुकीचे आहे. दि.१४.८.२००६ रोजी आपण राज्य माहिती आयोगाकडे अपील केले, त्यानंतर आपल्याला माहिती दिली, असे ॲड.पाटील यांनी

आयोगापुढील सुनावणीत सांगितले. ॲड.पाटील यांनी मागितलेली माहिती विस्तृत स्वरुपाची होती व ती एकत्रित करुन देण्यास विलंब लागणार असल्यामुळे तसे त्यांना मुदतीत कळविले होते व माहिती तयार होताच त्यांना तसे कळविले, असे तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता, श्रेणी-१ श्री.धीरज बाळकृष्ण साळे यांनी आयोगाला सादर केलेल्या निवेदनात नमूद केले. तत्कालीन अपिलीय प्राधिकारी तथा गटविकास अधिकारी, श्रेणी-१ श्री.चंद्रकांत वाघमारे यांनी तीन वेळा सुनावणीच्या तारखा दिल्या, परंतु अंतिम सुनावणीच्या दिवशी दि.१६.१०.२००६ रोजी ॲड.पाटील यांनी आपल्याला मागणी केलेली माहिती मिळाली असल्याचे लेखी दिल्यामुळे अपील निकाली काढल्याचे कळविले, असे विद्यमान अपिलीय प्राधिकारी तथा गटविकास अधिकारी, श्रेणी-१ श्री.प्रशांतसिंह मरोड यांनी आयोगासमोर लेखी व तोंडी नमूद केले.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि.४.८.२००८

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौंसिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.मंगेश कमलाकर जोशी
ए-२, भैरवनाथ सोसायटी,
आसरा सोसायटीचे मागे, होटगी रोड, सोलापूर — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा अप्पर जिल्हाधिकारी,
जिल्हाधिकारी कार्यालय, सोलापूर — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा जिल्हा पुनर्वसन अधिकारी,
जिल्हाधिकारी कार्यालय, सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | २९५ / सोलापूर / २००६ |
| २ | सुनावणीची तारीख | दि.१.२.२००८ |

३. **उपस्थित**

**जन माहिती अधिकारी** तथा जिल्हा पुनर्वसन अधिकारी,
जिल्हाधिकारी कार्यालय, सोलापूर श्री.शहाजी पवार

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ९.५.२००६ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १५.५.२००६ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. ३०.६.३००६ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. २.६.२००६ |
| ८ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती** | |

१. महाराष्ट्र शासनाचे धरणग्रस्तांच्या पुनर्वसनाचे धोरण आवश्यक त्या सुधारित शासकीय आदेशांसह.
२. माझे आजोबांचे नांवावर मौजे हळदुगे, ता.बार्शी येथील गट क्र.१९१ ही जमीन हिंगणी(पा) मध्यम प्रकल्पामध्ये १९७४ मध्ये बुडीत झाली आहे. मोबदल्यात पर्यायी

| | |
|---|---|
| | जमीन प्राप्त होईल का, असल्यास किती किंमतीत, नसल्यास का नाही, शासन निर्णयासह माहिती<br>३. हिंगणी(पा)मध्यम प्रकल्पात जमीन बुडीत झाल्यामुळे कोणकोणत्या शेतकऱ्यांना पर्यायी जमिनीचे (लाभक्षेत्रात) वाटप झाले आहे याची सविस्तर यादी.<br>४. माझ्या आजोबांची जमीन हिंगणी (पा) मध्यम प्रकल्पात बुडीत झाल्यामुळे वारसाहक्काने मला त्याबाबत धरणग्रस्त दाखला मिळेल काय, त्यासाठी लागणारी कागदपत्रे. जिल्हा पुनर्वसन कार्यालयाने सन २००६ पासून आजतागायत धरणग्रस्त दाखले प्रदान केले त्या शेतकऱ्यांच्या नावाची यादी. |

## विवेचन

महाराष्ट्र शासनाचे धरणग्रस्तांच्या पुनर्वसना विषयीचे धोरण व आपल्या आजोबांची शेतजमीन प्रकल्पात बुडीत झाली असल्यामुळे बारसा हक्काने पर्यायी जमीन प्राप्त होणे या विषयीची माहिती अपीलकर्ता श्री.मंगेश कमलाकर जोशी यांनी जन माहिती अधिकारी तथा जिल्हा पुनर्वसन अधिकारी, सोलापूर यांच्याकडे मागितली होती. जन माहिती अधिकारी यांनी माहिती दिली. परंतु मुद्दा क्र.४ ची माहिती मिळाली नाही, कार्यालयातील नोंदीच्या प्रती पुरवून माहिती देणे शक्य असताना आपल्याला रुपये ४०००/- शुल्क भरण्यास सांगितले व त्याचा हिशेब दिला नाही, असे नमूद करुन श्री.जोशी यांनी अपिलीय प्राधिकारी तथा अप्पर जिल्हाधिकारी, सोलापूर यांच्याकडे अपील केले. त्यांनी ते दाखल स्तरावरच फेटाळून लावले, म्हणून श्री.जोशी यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

श्री.जोशी यांना सर्व माहिती देण्यात आली आहे. सन २००३ ते मे २००६ या काळात जिल्हा पुनर्वसन अधिकाऱ्यांनी १००० दाखले दिले असून नक्कल फी अंदाजित रुपये ४०००/- जमा करावी, असे मुद्दा क्र.४ मध्ये त्यांनी विचारणा केल्यानुसार जन माहिती अधिकाऱ्यानी कळविले होते. श्री.जोशी यानी हे शुल्क भरलेले नाही. मर्यादित प्रती हव्या असल्यास वा अन्य अभिलेखाच्या प्रती अव्या असल्यास अभिलेखाचे निरीक्षण करुन आवश्यक प्रती देण्याची तयारी आहे, असे जन माहिती अधिकारी तथा जिल्हा पुनर्वसन अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, सोलापूर श्री.शहाजी पवार यांनी आयोगापुढील सुनावणीत नमूद केले. श्री.जोशी

सुनावणीला उपस्थित नव्हते, तसेच अपिलाव्यतिरिक्त कोणतेही लेखी निवेदन त्यानी सादर केले नव्हते.

'चुकीची अथवा दिशाभूल करणारी माहिती देण्याचा जन माहिती अधिकाऱ्यांचा उद्देश होता, हा अर्जदाराचा आक्षेप अर्जदाराच्याच विश्वासनीयतेस बाधा पोहोचविणारा वाटतो, शिवाय अपील करण्यामागे केवळ प्रतिशोध वाटतो. त्यामुळे सदरचे अपील उदात्त व पावित्र्याने दाखल केलेचे दिसून येत नाही,' हे प्रथम अपिलावरील निर्णयातील भाष्य अपिलीय प्राधिकारी तथा अप्पर जिल्हाधिकारी, सोलापूर यांनी साधार स्पष्ट करणे आवश्यक होते. आयोगाकडे केलेल्या अपिलात श्री.जोशी यांनी या भाषेला आक्षेप घेतला आहे, मात्र 'मधुकर आर्दड यांनी दाखल स्तरावरच अपील फेटाळून स्वतः झोटिंगशहा असल्याचे सिध्द केले आहे. निकालपत्रातील आर्दड याची भाषा म्हणजे माहिती अधिकाराच्या गैरवापरावर वृत्तपत्रातून वारंवार पत्र लिहिणाऱ्या रिकामटेकड्या वृत्तपत्रलेखकाला शोभेल अशी आहे,' या त्यांच्या विधानांवरुन त्यांच्या स्वतःच्या भाषेचा दर्जा स्पष्ट होतो.

जन माहिती अधिकाऱ्यांनी योग्य माहिती दिली आहे. कळविलेले शुल्क भरुन अथवा अभिलेखाचे निरीक्षण करुन आवश्यक ती माहिती प्राप्त करुन घेण्याचा मार्ग श्री.जोशी यांना उपलब्ध असूनही त्यानी त्याचा अवलंब केलेला नाही. कळविलेले शुल्क अंदाजित असून प्रत्यक्ष माहितीनंतर ऊर्वरित शुल्क कमी-जास्त केले गेले असते, असे जन माहिती अधिकारी श्री.पवार यांनी नमूद केले, ते रास्त आहे.

## आदेश

अपील अमान्य.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि.१८.८.२००८
ऑगस्ट-०८-८१-८३

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे 'विशेष अपील निर्गत कार्यक्रम' दि. ९.७.२००८ रोजी कोल्हापूर येथे आयोजित करण्यात आला होता. त्यात खालील अपिलाचा समावेश होता :

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ३१७ / कोल्हापूर | उपस्थिती |
| २ | अपीलकर्ता | श्री. शंकर आमोगी भोला<br>श्रमसाफल्य, प्लॉट नं. ३२, ए वॉर्ड,<br>चव्हाण कॉलनी, कळंबा रोड, कोल्हापूर | हजर |
| ३ | जन माहिती अधिकारी | सहाय्यक संचालक (व) (अतां),<br>व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण, मुंबई-१ | हजर |
| ४ | अपिलीय प्राधिकारी | उपसंचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण<br>संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई-४०० ०११ | गैरहजर |

अपीलकर्ता श्री. शंकर आमोगी भोला यांनी दि. १३.८.२००७ च्या माहिती अर्जान्वये दि. १.१.१९९६ ते ३१.५.२००३ सेवानिवृत्त दिनांक या कालावधीतील त्यांच्या वेतन श्रेणीतील थकबाकी अद्याप का मिळाली नाही ? ती केव्हा मिळेल ? व अजून किती निवृत्त निदेशकांना थकबाकी देय आहे, याची माहिती मागितली होती. श्री. भोला दि. ३१.५.२००३ रोजी सेवानिवृत्त झाले. दि. १.१.१९९६ ते ३१.५.२००३ या कालावधीतील थकबाकी त्यांना अद्याप मिळालेली नाही.

सदरची बाब ही संबंधित कार्यालयाच्या प्रशासकीय कार्यवाहीची असून शासनाकडे अनुदान मागितल्याची माहिती जन माहिती अधिकारी यांनी विहित मुदतीत दिली. मात्र शासन निर्णय झाल्याला तीन वर्ष होऊन गेली, आपल्या पत्रानंतर अनुदान मागणी केली गेली, थकबाकी अद्याप का मिळत नाही, याची माहिती आपल्याला मिळावी, अशी श्री. भोला यांची मागणी आहे. खुलासा अथवा स्पष्टीकरण मागणे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कक्षेत येत नाही. परंतु मान्य असलेली थकबाकी सेवानिवृत्त कर्मचाऱ्यास पाच पाच वर्षे मिळत नाही. अशा स्थितीत त्याची कारणे कळणे हा नागरिकांचा हक्क आहे.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

१. अपील अंशतः मान्य.

२. माहिती देण्यास झालेल्या विलंबाच्या कारणांची व अनुषंगिक कार्यवाहीची माहिती जन माहिती अधिकारी यांनी हा आदेश प्राप्त झाल्यापासून पंधरा दिवसांत अपीलकर्त्यास द्यावी व पूर्तता अहवाल आयोगास सादर करावा.

पुणे
दि. ३० .८.२००८

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र * पुणे खंडपीठ *

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ